आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र रात्री ८.०५ वाजता

२ मे २०२४ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार

- महाराष्ट्रात आज प्रमुख पक्षांच्या अनेक उमेदवारांचे अर्ज दाखल

- स्वातंत्र्याची शताब्दी साजरी होईपर्यंत भारत विकसित देशांच्या पंक्तीत बसला असेल, असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विश्वास

- इंडिया आघाडीमध्ये प्रधानमंत्री पदाबाबत अजून चर्चा झालेली नसल्याचं शरद पवार यांचं प्रतिपादन, तर राहुल गांधी प्रधानमंत्री होतील असा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचा दावा

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, तिसऱ्या टी ट्वेंटी सामन्यात भारताचा बांगला देशावर ७ गडी राखून विजय

<><><><><>

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत उद्या संपणार आहे. त्यामुळं अर्ज भरण्याची लगबग उमेदवारांमध्ये सुरू आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांनी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातून, तर कांग्रेसचे भूषण पाटील यांनी मुंबई उत्तर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. **कल्याण डोंबिवली** लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी, तर **पालघर** लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या उमेदवार भारती कामडी यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**दिंडोरी लोकसभा** मतदारसंघातून भाजपाच्या डॉ. भारती प्रविण पवार यांनी, तर **नाशिक** लोकसभा मतदारसंघातले शिवसेनेचे हेमंत गोडसे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.

दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे भाजपाचे माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण यांनी बंडखोरी करत दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे.

**<><><><><>**

स्वातंत्र्याची शताब्दी साजरी होईपर्यंत भारत विकसित देशांच्या पंक्तीत बसला असेल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. गुजरातमधल्या आणंद आणि सुरेन्द्रनगर इथं आज लागोपाठ घेतलेल्या प्रचारसभांमधून ते बोलत होते.

गेल्या दहा वर्षांत देशांत मोठं परिवर्तन घडून आलं असून आज भारताची प्रतिमा जागतिक स्तरावर उंचावली आहे, असं त्यांनी आणंद इथल्या प्रचारसभेत सांगितलं. अनुसूचित जातीजमातींना तसेच इतर मागासवर्गीयांना असलेलं आरक्षण आपलं शासन कायम ठेवेल पण धर्मावर आधारित आरक्षणाला विरोध करेल असं ते म्हणाले.

मतदारांनी विक्रमी संख्येने मतदान करण्याचं आवाहन त्यांनी सुरेंद्रनगर इथल्या प्रचारसभेत केलं. काँग्रेसच्या कार्यकाळात देशात अनेक घोटाळे आणि गैरव्यवहार झाले होते परंतु गेल्या दहा वर्षात एकही घोटाळा झालेला नाही असं त्यांनी म्हटलं. देशातल्या गरीब जनतेचा काँग्रेसवर आता विश्वास उरलेला नाही असं त्यांनी सांगितलं. भाजपा सरकारने दहशतवादाला सडेतोड उत्तर दिल असून देशात शांतता राखली आहे असं प्रधानमंत्री मोदी यांनी जुनागढ इथं प्रचारसभेत म्हटलं. काँग्रेस सरकारने तामिळनाडुजवळचं एक बेट शेजारच्या देशाला देऊन टाकलं परंतु भाजपा सरकार सर्व बेटांच्या सुरक्षेसाठी आणि पर्यटन विकासासाठी वचनबद्ध असल्याचं त्यांनी सांगितलं. दरम्यान, काँग्रेसच्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये समाजाच्या प्रत्येक वर्गाला न्याय दिला गेला असल्याचं काँग्रेस नेते अशोक गेहलोत यांनी म्हटलं आहे. ते आज अहमदाबादमध्ये वार्ताहरांशी बोलत होते. या सरकारच्या काळात लोकशाही संकटात आली असून भाजपने महागाई आणि बेरोजगारीसारख्या महत्वाच्या समस्यांकडे दुर्लक्ष केलं असल्याचा आरोप त्यांनी केला .

आम आदमी पक्षाच्या नेत्या सुनीता केजरीवाल यांनीही आज भावनगरचे त्यांचे उमेदवार उमेश मकवाना यांच्यासाठी रोडशो केला.

**<><><><><>**

या निवडणुकीत जनता जंगलराज आणि घराणेशाहीच्या ऐवजी विकासाला मत देईल असं भाजपा नेते अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते उत्तर प्रदेशात बरेली इथल्या प्रचारसभेत बोलत होते. भाजपाने आतापर्यंतच्या निवडणूक जाहीरनाम्यांमधे दिलेली सर्व आश्वासनं पाळली असल्याने जनतेचा भाजपावर पूर्ण विश्वास असल्याचं त्यांनी बदायूं इथल्या प्रचारसभेत सांगितलं.

भाजप नेते आणि मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी मैनपुरी इथं घेतलेल्या रोड शो मध्ये अनेक बुलडोझर आणले होते. समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी बदायूंमध्ये प्रचारसभा घेतली. भाजप सरकार जनतेची दिशाभूल करत आहे असा आरोप त्यांनी केला.

बहुजन समाज पक्षाच्या नेत्या मायावती आज मैनपुरीत प्रचारसभा घेणार आहेत. राष्ट्रीय लोकदलाचे प्रमुख जयंत चौधरी आज हाथरस मध्ये सभा घेतील. दरम्यान बसपाने आणखी एक यादी जाहीर केली असून त्यात ६ लोकसभा उमेदवार आणि एका विधानसभा पोटनिवडणुकीच्या उमेदवाराच्या नावाचा समावेश आहे.

**<><><><><>**

फक्त काँग्रेस पक्षच भाजपा पासून संविधानाचं रक्षण करू शकतो, असं काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटलं आहे. कर्नाटकात शिवमोगा इथं एका प्रचारसभेत ते आज बोलत होते. केंद्रात सत्तेवर आल्यास काँग्रेस कोणाचीही संपत्ती हिरावून न घेता गरिबांना मदत करेल असं काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे या सभेत म्हणाले. राहुल गांधी यानंतर रायचूर मध्ये प्रचारसभा घेणार आहेत.

भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री नारायणस्वामी यांनी आज कोप्पल जिल्ह्यात सभा घेतली . मोदी सरकारने दलितांच्या कल्याणासाठी नेहमीच काम केलं असून कर्नाटकात भाजपाच्या सरकारने मागासवर्गीयांसाठी आरक्षण १५ टक्क्यांवरून वाढवून १७ टक्के केलं होत, असं त्यांनी वार्ताहरांना सांगितलं.

<><><><><>

श्रोतेहो, 'लोकनिर्णय महाराष्ट्राचा' या कार्यक्रमात उद्याच्या भागात आपण जळगाव- रावेर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

इंडिया आघाडीमध्ये प्रधानमंत्री पदाबाबत अजून चर्चा झालेली नाही. पुरेसं संख्याबळ आल्यावर निर्णय घेतला जाईल. त्यामुळं इंडिया आघाडी अस्थिर सरकार देईल असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा दावा चुकीचा

असल्याचं शरद पवार यांनी कोल्हापुरातल्या पत्रकार परिषदेत आज सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वर्तवणुकीवरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. राज्यातल्या लोकसभा निवडणुका ५ टप्प्यात घेण्यावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. सत्ताधारी पक्षाला अधिकाधिक ठिकाणी प्रचाराची संधी मिळावी म्हणून जाणीवपूर्वक राज्यातली निवडणूक लांबवल्याचा आरोप त्यांनी केला.

दरम्यान, इंडिया आघाडीची सत्ता आल्यावर राहुल गांधी प्रधानमंत्री होतील असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला होता.

सध्याच्या प्रधानमंत्र्यांना स्वातंत्र्यचळवळीची कोणतीही पार्श्वभूमी नाही परंतु ते नेहरूंवर टीका करत असतात, असं शरद पवार यांनी सांगलीतल्या प्रचारसभेत म्हणाले. सध्याचं सरकार लोकशाही राज्यामध्ये अनेकांना कारण नसताना तुरुंगात टाकत आहे, असा आरोप त्यांनी केला.

**<><><><><>**

मतदान हे सीमेवर लढण्याइतकंच महत्वाचं आहे असं काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी म्हटलं आहे. त्या आज मध्य प्रदेशात मोरेना इथल्या प्रचारसभेत बोलत होत्या. भाजपा सरकार जनताविरोधी आहे आणि सध्याचा बेरोजगारीचा दर गेल्या ४५ वर्षातल्या सर्वोच्च पातळीवर आहे असा आरोप त्यांनी केला.

छत्तीसगढमधलं काँग्रेस सरकार अनेक लोकोपयोगी कामे करत होतं परंतु केंद्रातील भाजपा सरकार मात्र शेतकरी आणि कामगारांच्या विरोधात धोरण

राबवत असल्याचा आरोप त्यांनी छत्तीसगडच्या कोर्बा मतदारसंघात प्रचारसभेत बोलताना केला.

**<><><><><>**

तृणमूल काँग्रेसच्या कार्यकाळात पश्चिम बंगालचा विकास झाला आहे, मात्र केंद्र सरकारनं बंगालकडे दुर्लक्ष केलं, असा आरोप तृणमूल काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केला.पश्चिम बंगाल मधल्या नाडिया इथल्या तेहत्ता इथं झालेल्या प्रचार सभेत आज त्या बोलत होत्या. सी ए ए अर्थात नागरिकत्त्व सुधारणा कायदा आणि एन आर सी अर्थात राष्ट्रीय नागरिक नोंदणी पश्चिम बंगाल मध्ये लागू होऊ देणार नाही, असंही त्या म्हणाल्या.

**<><><><><>**

आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस तयार असेल तर एकत्र निवडणूक लढवण्याची इच्छा वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली आहे. ते आज लातूरमध्ये वंचित आघाडीचे उमेदवार नरसिंग उदगीरकर यांच्या प्रचारासाठी आले असता बातमीदारांशी बोलत होते.

भाजपा-शिवसेनेचं लुटुपुटुचं भांडण सुरु आहे. लोकसभा निवडणुकीनंतर भाजपासोबत जाणार नाही याची खात्री उद्धव ठाकरे यांनी अद्याप महाराष्ट्राला दिलेली नाही, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

जाहिरातींद्वारे, सर्वेक्षणाद्वारे किंवा ऍप्सच्या माध्यमातून निवडणुकीनंतरच्या लाभार्थी केंद्रित योजनांसाठी नावनोंदणी करण्याच्या कृती तात्काळ बंद करण्याचे आदेश निवडणूक आयोगानं आज सर्व राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांना दिले. अशा कोणत्याही भविष्यकालीन योजनांसाठी नावनोंदणी करण्यामुळे मतदारांना प्रलोभनं दाखवली जाऊन निवडणुक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. अशा जाहिराती दिसल्यास जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यावर योग्य ती कारवाई करावी, असे निर्देश निवडणूक आयोगानं दिले आहेत.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, आज बांगलादेशात सिल्हट इथं झालेल्या तिसऱ्या टी-ट्वेंटी सामन्यात भारतानं बांगलादेशावर ७ गडी राखून विजय मिळवला. भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला, आणि बांगलादेशाचा डाव ८ बाद ११७ धावांवर रोखला. स्मृती मंधना, शेफाली वर्मा, यांनी दिलेल्या ९१ धावांच्या भागीदारीमुळे भारतानं विजयी लक्ष्य २ गड्यांच्या मोबदल्यात १९ व्या षटकातच पार केलं. शेफालीनं ५१, तर स्मृती मंधनानं ४७ धावा केल्या.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबाद आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात

सामना सुरु आहे. सनरायझर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा हैदराबादच्या ८ षटकात २ बाद ४८ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//